नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक २२/०३/२०२२ (मंगळवार)

(सकाळ)

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत भारकस चौक येथे दिनांक २०/०३/२०२२ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नरेंद्र तुलाराम शेंडे वय २४ वर्षे रा.भारकस ता. हिंगणा जि.नागपुर हे जॉनसन कंपनीतुन रात्री कामावरून आपले घरी भारकस येथे जात असता त्यांचें सोबत काम करणारा आरोपी नामे— ज्ञानेश्वर परसराम शेंडे वय ३२ वर्ष, रा. भारकस यांने म्हटले की, 'माझे पत्नी सोबत लग्ना अगोदर व लग्नानंतर तुझे प्रेम संबंध आहे' या कारणावरून वादावाद करून आरोपी याने फिर्यादीस जिवे मारण्याचे हेतुने त्याचे जवळील कुऱ्हाडीने गालावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री रामश्वर रॉय मो.क्र. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर